# प्रकरण ७

## वाखसा आणि आज्ञापत्र

मराठा राज्य निर्मितीच्या कार्यापासून म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापूर्वीपासून, ते मराठा राज्य औरंगजेबाच्या मृत्यूनंतर स्थिरस्थावर होईपर्यंत, रामचंद्रपंत अमात्य यांनी संपूर्ण आयुष्य मराठी राज्याच्या सेवेत घातलेले आहे. एवढी दिर्घकाल मराठा राज्याची सेवा करणाऱ्या मुठभर लोकांच्यामध्ये रामचंद्रपंत हेच एकमेव अग्रणी आहेत. पंताचा मृत्यू दिनांक ८ फेब्रुवारी १७१६ रोजी झाल्याचा निष्कर्ष अनेक इतिहासकारांनी काढलेला आहे. विशेषत: रामचंद्र परशुराम पंडित[१] यांनी "श्री. रामचंद्रपंताचे मृत्यूसंबंधी टिपण" या दिनांक ३-८-१९७४ च्यालेखामध्ये, या संबंधी वेगवेगळया पुराव्या आधार घेऊन रामचंद्र-पंताच्या मृत्यूची तारीख निश्चित केली आहे. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी सुध्दा या संबंधी निष्कर्ष काढताना सांगितले आहे की रामचंद्रपंताचा मृत्यू इ.स. १७१५ च्या अखेरी किंवा इ.स. १७१६ च्या सुरवातीला झाला असला पाहिजे.[२] गर्गे याचा सुध्दा असाच निष्कर्ष आहे.[३]

मराठयांच्या इतिहासात कर्त्या पुरुषांच्या जन्म मृत्युच्या तारखा निश्चित करणे, हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. पण अशा तारखा मागेपुढे झाल्यातरी, या कर्तृत्ववान व्यक्ती झाल्या नाहीत, असे काही कोणाला म्हणता येणार नाही. रामचंद्र पंताच्या मृत्यू तारखेचा दिवस नक्की करताना लेखाच्या शेवटी पंडित यांनी पुढील प्रमाणे विवेचन केले आहे--

---

१. प्रस्तुत प्रबंधातून., पृ. १६.

२. Pawar, A.G., Studies in Maratha History, Vol. I, Shivaji University, Kolhapur, 1971, p. 183.

३. गर्गे, स.मा., उपरोक्त., पृ.११०.

"९ मार्च १७१६ ला भगवंतराव यांचा पंत अमात्य म्हणून उल्लेख या तारखेच्या जास्तीत जास्त पाठिमागे म्हणजे एक महिन्याचा कालावधी धरला. (३० दिवस) व पोर्तुगीजांचे पंताना शोकाचे पत्र १७ फेब्रुवारीचे आहे. त्यांना पंतांच्या मृत्यूची बातमी कळणेस ८-१० दिवस लागतील असे समजून १७ फेब्रुवारी-पर्यंत त्यांना खबर नव्हती. त्यातून ९ दिवस वजा करून ८ फेब्रुवारी १७१६ ही पंतांच्या मृत्यूची तारीख निश्चित केली."

रामचंद्र पंताची वतने व इनामे:

मराठा राज्याची जवळजवळ ४८ वर्षे सेवा करणारे रामचंद्र पंतासारखे थोर व कर्तृत्ववान पुरुष मृत्यू कालापर्यंत जगलेले नव्हते. या दिर्घ सेवेच्या कालात पंताना अनेक वतने व इनामे मिळाली होती. त्या वतनांची माहिती गोरे यांनी थोडक्यात पुढील प्रमाणे दिली आहे--

अ) पंताच्या घराण्यांत पूर्वापार चालत आलेली वतने.

१. तर्फ सोनके प्रांत भिंवडी येथील कुळकर्णपण व जोतीशापण.

२. मौजे तांदळी तर्फ रांजणगाव येथील कुळकर्णपण व जोशीशापण.

३. मौजे केलवड तर्फ खेडेबारे येथील एक चावर शेत.

ब) रामचंद्रपंतास राजारामाने दिलेली वतने.

१. तर्फ आजिरे येथील देशकुळकर्ण (हे पंतानी सिरणी होन १००० देऊन घेतले.)

२. तपे खारापाटण येथील सरदेशमुखी.

३. मौजे मुरादपूर येथे रामचंद्रपंताच्या आईचे वृंदावन म्हणून धर्मकृत्यासाठी इनाम दिल्हा.

४. तपे सालशी येथील देशमुखी.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

५. पोटी संतान नव्हते म्हणून भगवंतराव झाल्याचे समजताच आनंदाने राजारामाने भगवंतरावास दूधमातानिमित्त मौजे खेकोली तर्फ शानापूर हा गाव इनाम दिला.

अशा त-हेने पंतांची राजारामाच्या कालापर्यंत एकूण वतने ५, इनामी गावे ४, व त्यावर अधिक एक, एवढी होती.[४] आणि या त्यांच्या इस्टेटीमध्ये पुढे कोल्हापूर छत्रपतींनी भर घातलेली आहे. त्यातूनच त्यांची गगनबावडा जहागीर निर्माण झालेली आहे.[५]

वारसदार:

रामचंद्र पंताची गोरे यांच्या मतानुसार दोन लग्ने झाली होती. त्यातील पहिले लग्न मोरेपंत पिंगळे म्हणजे शिवाजी महाराजांचा पेशवा यांची कन्या, जानकीबाई हिच्याबरोबर झालेले होते. दुसरे लग्न यादवराव शिवदेव काटे यांच्या कन्येबरोबर झाले होते. रामचंद्र पंताच्या वैवाहिक जीवनाची तथा घरगुती वागणुकीची फारशी माहिती उपलब्ध नाही. एवढेच नव्हे, तर त्या संदर्भात अजून कोणी लिहिलेले नाही. गर्गे यांनी रामचंद्र पंताना तीन मुलगे होते, ऐवढीच माहिती दिली आहे. पण रामचंद्रपंताच्या दोन लग्नांची किंवा दोन बायकांची माहिती दिलेली नाही. गर्गे केवळ मोघमपणे लिहितात--

"रामचंद्रपंताना तीन मुलगे होते: भगवंतराव रामचंद्र, मोरेश्वर रामचंद्र आणि सिताराम रामचंद्र. त्यांपैकी भगवंतराव रामचंद्र यांची कोल्हापूरच्या अमात्य पदी नेमणूक झाली होती."[६] बाकीच्या दोघांच्या विषयी गर्गे यांनी काहीही लिहिलेले नाही. या तीन पुत्राखेरीज रामचंद्र पंताना एक मुलगी होती.

४. सबनीस, ऐ.गो., उपरोक्त., ले.२४,२५,२६,३९,५२,५३.
५. गोरे, रा.म., उपरोक्त-भूगोल भाग, पृ.९.
६. गर्गे, स.मा., उपरोक्त., पृ.१४१.

तिचे नाव व्यंकूबाई.[७] रामचंद्र पंताचा अशा त-हेचे कौटुंबिक परिवार होता. या परिवारातील त्याचे ज्येष्ठ चिरंजीव भगवंतराव, हे पंताच्यानंतर कोल्हापूरचे अमात्य झाले. त्यांनाच पुढे गगनबावडा ही जहागीरी मिळाली. या जहागीरीवरूनच रामचंद्रपंताच्या घराण्याला "बावडेकर पंत अमात्य" असे नाव मिळाले आहे.[८] अशा त-हेने रामचंद्रपंताचे अस्तित्व जहागिरीच्या नावाने मराठा इतिहासात कायमचेच आजरामर झालेले आहे. अर्थात असे असले तरी, त्यांचे नाव मराठा इतिहासात अजरामर झाले आहे त्यानी लिहिलेल्या "आज्ञापत्र" या ग्रंथामुळे - कोल्हापूर संभाजीला मार्गदर्शनपर लिहिलेला हा छोटासा ग्रंथ "आज्ञापत्र" म्हणजे मराठा राज्याच्या एकूण जडणघडणीचा तथा राजनीतीचा अर्क आहे. एका अर्थाने "आज्ञापत्र" म्हणजे रामचंद्र पंताचे एक सर्वश्रेष्ठ आणि चिरंतन असे अपत्यच आहे. स्वाभाविकच ते त्यांच्या नैसर्गिक वारसापेक्षा श्रेष्ठ, असेच मानावे लागेल.

## रामचंद्रपंताचे आज्ञापत्र:

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजनीतिची माहिती "आज्ञापत्र" या छोटयाशा पुस्तिका वजा ग्रंथात आहे. हा ग्रंथ रामचंद्रपंत अमात्य यांनी तारीख १९ नोव्हेंबर १७१५ रोजी लिहून पूर्ण केला असावा, असे सरदेसाई[९] व इतरांची मते आहेत. या संबंधी अधिक खुलासा करताना सरदेसाई यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली आहे--

"शिवाजीच्या राज्यपद्धतीचीं धोरणें काय होतीं, आणि तीं पुढे का व कशीं सुटत गेलीं हा प्रश्न इतिहासाध्ययनाला उपयोगी आहे, त्या संबंधात संभाजीचे

---

७. गोरे,रा.म,उपरोक्त.,पृ.७५.

८. अ) उपरोक्त.,पृ.८९-९०. ब) सबनीस,के.गो.,उपरोक्त.,परिचय,पृ.२ ते ४.

९. सारोपण्याचा., पृ.७६.

आज्ञापत्र म्हणून जो लेख प्रसिध्द झालेला आहे त्यांत रामचंद्रपंत अमात्यानें शिवाजीची पध्दती स्पष्ट रीतीने दाखविली आहे. हे आज्ञापत्र शाके १६३७ म्हणजे इ.स. १७१५ ता. १९ नोव्हेंबरचें रामचंद्रपंत अमात्य हुकूमतपन्हा यानें लिहिलें आहे. प्रधान कसे नेमावे, फौजेची, किल्ल्यांची आरमाराची वगैरे व्यवस्था कशी ठेवावी, इत्यादी गोष्टी यांत सांगितलेल्या आहेत."[१०]

पुढे "आज्ञापत्रात" इतर ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, विशेषत: पाश्चिमात्य सावकार म्हणजे फिरंगी, इंग्रज वगैरे लोकांच्या बरोबर कसे संबंध ठेवावे याविषयी नेमके काय आहे, ते सरदेसाई यांनी स्पष्ट केलेले आहे.

अर्थात सरदेसाईंनी "आज्ञापत्र" लेखनाची तारीख जी १९ नोव्हेंबर १७१५ सांगितली आहे, ती "आज्ञापत्र" ज्या दिवशी लिहावयाला सुरवात केली, त्या दिवसाची तारीख असावी. कारण के.गो. सबनीस यांनी संपादित केलेल्या "पंत अमात्य बावडा दप्तर भाग १ला" या ग्रंथात आज्ञापत्र लिहिलेल्याचीतारीख १९ डिसेंबर १७१५ अशी आहे." याचा अर्थ असा असेल की आज्ञापत्र लिहिण्यास एक महिन्याचा कालावधी लागला असेल व त्यानंतर ते १९ डिसेंबर १७१५ रोजी संभाजी महाराजांना सादर केले असेल.

"आज्ञापत्र" हे रामचंद्र पंतानीच लिहिलेले आहे, या विषयी आता एकमत झालेले आहे. तथापि, प्रारंभीच्या काळात म्हणजे सन १८७५-७६ मध्ये मुंबईच्या विविध ज्ञानविस्तार या मासिकातून क्रमश: "आज्ञापत्र" प्रथम प्रकाशित झाल्यावर महाराष्ट्रामध्ये सामान्यत: १९३९ पर्यंत "आज्ञापत्रा"चा कर्ता रामचंद्रपंत की आणखी कोण ? असा वाद चालू होता.[१२] आता तो वाद मिटला असून रामचंद्रपंत हेच

---

१०. उपरोक्त., पृ.७७.
११. सबनीस,के.गो., उपरोक्त.,पृ.१७७.
१२. खरे-भिडेआ.,पृ.३-५.

"आज्ञापत्राचे" कर्ते आहेत, हे डॉ. व.दि.राव, सरदेसाई, पुणतांबेकर, द.वा. पोतदार यांनी इ.स. १९४५ ला मान्य केलेले आहे.[१३] आणि रामचंद्रपंत यांनीच "आज्ञापत्र" लिहिलेले आहे, हे आता असे रूढ झालेले आहे. तेव्हा या "आज्ञापत्रा"त नेमके काय आहे व रामचंद्रपंतानी ते कशासाठी सांगितले आहे, एवढेच पाहण्याचे आहे.

कोल्हापूर छ. संभाजीला मार्गदर्शन करण्याच्या निमित्ताने-

कोल्हापूर मध्ये इ.स. १७१४ मध्ये राज्यक्रांती होऊन राजाराम महाराजाचे धाकटे चिरंजीव, म्हणजे ताराबाईचा सावत्र मुलगा संभाजी गादीवर आला. तो वयाने लहान होता आणि त्याची आई राजसबाई ही ताराबाईसारखी चतुर, राजकारणी आणि शूर अशी नव्हती. ताराबाईच्या तुलनेत ती स्वत: राज्य-कारभार करील, अशा प्रकृतीची नव्हती. त्यामुळे राज्य चालविण्याचा सर्व भार रामचंद्रपंताच्यावरच पडलेला होता. तो भार पेलण्यास पंत समर्थ होते. पण त्यांचेही वय झालेले होते. तेव्हा त्या परिस्थितीत आज ना उद्या आपला राज्य-कारभार आपणासच पाहावा लागेल, याची जाणीव संभाजी आणि त्याच्या आईला झालेली असली पाहिजे. म्हणूनच राजकारणाची माहिती समजून घेण्या-साठी, विशेषत: मराठा राज्य संस्थापक छ.शिवाजी महाराज यांनी राज्य कसे चालविले, कोणती नीती वापरली, कोणते सूत्र अंगिकारले, आणि यश कसे मिळ-विले, याविषयी माहिती जाणून घेणे व त्यानुसार राज्यकारभार करणे संभाजीच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. म्हणूनच त्याने रामचंद्राच्याकडे शिवाजी महाराजांच्या राजनीती विषयक माहितीची विचारणा केली व ती हकीकत सविस्तरपणे कथन करायला सांगितली. आणि ते लिखित कथन म्हणजेच हे "आज्ञापत्र" होय.

---

१३. बनहट्टी,श्री.ना., संपा.उपरोक्त.,पृ.१७-१८.

या आज्ञापत्रात एकूण ९ प्रकरणे आहेत. आणि एकूण पृष्ठ संख्या "पंत अमात्य बावडा दप्तर भाग १", मध्ये ४३ आहे.[१४] पण "आज्ञापत्र" या ग्रंथाचे अनेक विद्वानांनी संपादन करुन वेगवेगळे ग्रंथ प्रकाशित केले असल्याने व त्या ग्रंथांची मांडणी वेगवेगळया धरतीवर केल्याने, पृष्ठसंख्या कमी जास्त झालेली आहे. तथापि "पंत अमात्य बावडा दप्तर भाग १", मधील "आज्ञापत्र" हेच आधारभूत "आज्ञापत्र" असून तोच मजकूर वेगवेगळया ग्रंथ कर्त्यांनी आपआपल्या पध्दतीने मांडलेला आहे. ग.ह. खरे व श्री.र. भिडे यांनी संपादित केलेल्या "आज्ञापत्रा"मध्ये एकूण ९ प्रकरणे दिलेली आहेत आणि या ९ प्रकरणात रामचंद्र-पंतानी दिलेली माहिती ऐतिहासिक पार्श्वभूमीवर यथोचितपणे विषद केलेली आहे. इतिहासाच्या अभ्यासकांच्या दृष्टीने ती महत्त्वाची असल्याने त्याच आधारे पंताच्या "आज्ञापत्रा"तील प्रकट झालेली शिवाजी महाराजांची राजनीती सांगितली आहे.

<u>प्रकरण १ ले</u>: आज्ञापत्राच्या लिखानाची सुरवात "स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४२, मन्मथनाम संवत्सरे मार्गशीर्ष शुध्द चतुर्थी गुरुवासरे, (शनिवार) क्षत्रिय-कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमतपन्हा यांसी आज्ञा केली ऐसीजे"[१५] अशी केली आहे. यावरुन हे स्पष्ट होते की मराठा संस्थापक छत्रपती शिवाजी राजे यांचे व रामचंद्रपंताच्याकडून "आज्ञापत्र" लिहून घेणारे "श्रीराजा शंभू छत्रपती" यांचा संबंध काय आहे, तसेच प्रारंभीच राज्याभिषेक शाक ४२ असा दिला आहे. तेव्हा हे "आज्ञापत्र" केव्हा, कोणी व कोणाकडून लिहून घेतले, हे त्यावरुन स्पष्ट होते. पुढे या प्रकरणामध्ये ग.ह. खरे यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे शिवाजी

---

१४. सबनीस,के.गो., <u>उपरोक्त</u>., पृ.१७७-२१९.

१५. <u>खरे-भिडेया</u>.,प्रकरण १ले, पृ.१.,

महाराजांनी कोणत्या रीतीने राज्य स्थापन केले व ते कसे वाढविले, याविषयी यथाचित माहिती आहे.[१६] ही माहिती देताना पंतानी शिवाजी महाराज गादीवर येण्यापूर्वीची जी कठीण परिस्थिती होती, ती व त्यानंतर स्थिरस्थावर झालेली परिस्थिती, यांचीही माहिती दिलेली आहे. आणि खरे यांच्या मताप्रमाणे त्या माहितीविषयी वाद उत्पन्न होण्याची शक्यता नाही.[१७]

त्यानंतर शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराज राज्याधिकारी कसे झाले, याची माहिती दिलेली आहे. ती माहिती देताना संभाजीला अनेकांना दुखवावे लागले होते, व जे सेवक दुसरीकडे निघुन गेले होते, त्यांनाही त्यांची समजूत काढून, त्यांचा मानमतराब जतन करुन संभाजीने राज्य रक्षणाचे कार्य, कसे यशस्वीपणे केले, ते सांगितले आहे. संभाजीचे धोरण स्पष्ट करताना रामचंद्रपंत लिहितात--"असे जाहले असतां स्वामींनीं तितकाही विचार बरा चित्तांत आणून हे राज्य म्हणजे केवळ ईश्वरदत्त, या राज्याची अभिवृध्दि व्हावी हे ईश्वरास परम आवश्यक, तदनुरुप श्रीनें राज्याचे अभिवृध्दीचा कीर्तिलाभ स्वामीच्याच विभागास आणिला आहे असें समजून, यथास्थित निश्चयें ईश्वरस्मरण करुन, तत्प्रसादसामर्थ्ये या सकल विस्खलित प्रसंगांत बरी सूक्ष्मबुध्दि चालवून, जे ईश्वरनिष्ठ परंपरागत सेवक बुध्दिवंत कुलकर्मी होते त्यांस ज्या उपायें मनोधारणा करणे त्या विचारें त्यांची समाधाने केली, आणि विचारबुध्दि हळूहळू वाढवून सर्वही आपलाले अधिकारानुरुप कार्याविषयीं सानुरक्त उद्योगतत्पर केले."[१८]

संभाजीच्या काळात स्वराज्याची परवड कशी झाली होती, व ती संभाजी राजांनी पुन्हा कशी सुव्यवस्थित केली, सर्व सरदारांना स्वराज्याच्या कामासाठी कसे लावले व त्याचे सूत्र काय होते, हे स्पष्ट केले आहे. त्याबरोबरच औरंगजेबासारखा "औपन्न पादशाहीचा धणी सैन्यादि देशकोशाविषयी अद्वितीय

---

१६. <u>उपरोक्त</u>.,प्रस्तावना,पृ.२०.
१७. <u>उपरोक्त</u>.
१८. <u>उपरोक्त</u>.,आज्ञापत्र,पृ.६ आणिहाच मजकूर बनहट्टी संपादित "<u>आज्ञापत्र</u>" मध्ये पृ.५७-५८ वर आलेला आहे.

समृद्धिदमान, किंबहुना या पृथ्वीतलाच्या ठायी "दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा" अशी ज्याची प्रख्यातारव्या, अशा महान् शत्रूशी संग्रामप्रसक्त जाहल्यावर त्याचा पराजय विनाश्रम स्वल्पायासें (होणें) परम कठीण, तदनुरूप परस्पर (समर) प्रसंगातिशयामुळे संपूर्ण राज्यातील प्रजा पीडा पावली."[19] संभाजीच्या काळात औरंगजेबासारखा बलाढय शत्रू मराठ्यांचे स्वराज्य नेस्तनाबूत करण्यासाठी दिल्लीहून आलेला होता. एवढया प्रचंड सामर्थ्याच्या शत्रूपुढे मराठ्यांनी टिकाव धरून रहावे, अशी परिस्थिती नव्हती. शिवाजी राजानी घालून दिलेल्या आदर्श परंपरेने राज्य करीत असताना औरंगजेबाकडून संभाजी कसा पकडला गेला, व मराठ्यांच्यावर कसे संकट आले. हे निवेदन केले आहे. तथापि मराठ्यांनी धीर सोडला नव्हता. शिवाजी राजाचे व्यक्तीतत्व व कार्य, उदंड, प्रेरणा आणि सामर्थ्य देणारे होते. त्यांनी निर्माण केलेली राजनीती व युध्दनीती औरंगजेबासारख्या बलाढय शत्रू विरूध्द सामान करण्यास समर्थ होती. रामचंद्र पंतानी ही बाब प्रकर्षाने या प्रकरणात मांडलेली आहे. बनहट्टी यांनी १९३९ मध्ये इंडियन हिस्ट्री कांग्रेसमध्ये "शिवाजीच्या राज्यतंत्राचे राजकीय आणि सामाजिक महत्त्व"[20] या अर्थाचा इंग्रजी शोध निबंध वाचलेला होता. या निबंधामध्ये "आज्ञापत्र" व मराठ्यांच्या संबंधीच्या दोन बखरी: सभासद बखर व चिटणीस बखर यांचा तुलनात्मक आढावा घेतला आहे. त्यामध्ये ते म्हणतात-- "आज्ञापत्र" हा सर्वांत अधिक वास्तववादी ग्रंथ आहे. सभासद आणि चिटणीस हे आपआपल्या बखरींमध्ये राज्यमंत्राचे प्रत्यक्ष तपशील आणि लष्करी व मुलकी शासनाच्या मांडणीचा आराखडा देतात, तर आज्ञापत्रकर्ता हा निव्वळ तत्वनिवेदक आहे. तथापि तो वस्तुस्थितीच्या आधारावर आपली प्रमेये बसवितो. त्याची विधाने म्हणजे शिवाजीच्या काळी प्रत्यक्ष चालू असलेल्या गोष्टींवरून काढलेली ठाशीव आणि सारभूत अशी तत्त्ववचने आहेत. तात्त्विक निवेदनाबरोबरच शिवाजीच्या अनेक शहाणपणाच्या योजनांच्या

---

१९. जोशी श.ना. व भिंगारे, ल.म., } संपा. हुकुमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य यांचे आज्ञापत्र आणि राजनीति, कान्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६०, पृ. ३.

२०. बनहट्टी, श्रीना., उपरोक्त., पृ. १४७.

आधारे धार्मिक उपदेशाचे घुटकेही तो पाजातो. तो राजांच्या वर्तनक्रमाचे सर्वसामान्य नियम घालून देतो, तसेच शासनाची विभिन्न कार्ये कोणत्या व्यापक धोरणानुसार चालावी याचे विवेचन करतो."[२१]

ग.ह. खरे यांच्या मतानुसार "आज्ञापत्रा"तील प्रकरण ३ ते ९ यामध्ये रामचंद्रपंतानी मराठयांच्या प्रत्यक्ष राजनीतीची माहिती दिलेली आहे. आणि ते बरोबर आहे. कारण दुसऱ्या प्रकरणात संभाजी महाराजांच्यानंतर राजाराम महाराजांची जी कारकीर्द झाली, तिची माहिती आहे. तसेच राजारामाने मराठा राज्याची विस्कटलेली घडी कशी बसविली, सिद्दीचा बंदोबस्त कसा केला, व तंजावर पर्यंतचा दक्षिण विजय करुन उत्तरेकडे औरंगाबाद बऱ्हाणपूर पर्यंत मोगल सत्तेचा पाडाव करुन मराठयांचे प्रभुत्व कसे प्रस्थापित केले, याचे विवेचन केलेले आहे. त्याच बरोबर आपल्या अंत्यकाली राजाराम महाराजांनी आपल्या स्वत:वर "हुकूमतपन्हा" या नात्याने कशी जबाबदारी सोपविली, याची माहिती आहे.[२२] या प्रकरणानंतर स्वाभाविकच तिसऱ्या प्रकरणाला मथळा ग.ह. खरे, यांनी "राजनीतीची मूलभूत तत्त्वे" असा दिला आहे.[२३] पण तिसऱ्या प्रकरणाचा हा मथळा, किंवा हे नाव सार्थक असले तरी "आज्ञापत्र" संपादित करणाऱ्या दुसऱ्या विद्वानांनी आपआपल्यापरीने या तिसऱ्या प्रकरणाचे नाव दिलेले आहे. उदा. जोशी व भिंगारे यांनी "राजकर्तव्ये"[२४] हे नाव दिले आहे. पण बनहट्टी[२५] आणि प्र.न. जोशी[२६] यांनी संपादित केलेल्या "आज्ञापत्रा"मध्ये तिसऱ्या प्रकरणाला कोणतेही नाव दिलेले नाही. तसेच के.गो.सबनीस यांनी संपादित केलेल्या "पंत अमात्य बावडा दप्तर भाग१ला" मध्ये जे "आज्ञापत्र" दिलेले आहे, त्या मध्येही प्रकरण वजा माहिती दिली नाही. स्वाभाविकच त्या ठिकाणी

---

२१. उपरोक्त., पृ.१४८.
२२. जोशी व भिंगारे, उपरोक्त.,पृ.६-१३.
२३. खरे-भिडेआ.,पृ.३२.
२४. जोशी व भिंगारे.,उपरोक्त.,पृ.१३.
२५. बनहट्टी,श्री.ना.,उपरोक्त.,पृ.६९.
२६. जोशी प्र.न.,संपा.आज्ञापत्र, विहनय प्रकाशन,पुणे,१९६०,पृ.आज्ञापत्र.पृ.१०

प्रकरणाची नावे किंवा मथळेही दिलेले नाहीत.[२७]

मुळच्या "आज्ञापत्र" मध्ये सबनीसानी उल्लेख न केल्याप्रमाणे सलगपणे शिवाजीमहाराजांच्या व मराठयांच्या राजनीतीची माहिती असली तरी ती अभ्यासकांच्या सोयीसाठी प्रकरण वाने मांडण्याची गरज आहे. आणि ती गरज भागविण्याचा प्रयत्न जोशी व भिंगारे यांनी, तथा खरे व भिडे यांनी "आज्ञापत्र" संपादन करुन इ.स. १९६० मध्ये पुरी केली आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमीवर खरे व भिडे यांचे प्रतिपादन अधिक उकल असल्याने त्यांनी संपादित केलेल्या "आज्ञापत्रा" ला थोडे जास्त महत्त्व आहे.

खरे व भिडे यांनी "आज्ञापत्रा"तील "राजनीतीची मूलभूत तत्त्वे"[२८] तिस-या प्रकरणात सांगताना राजनीतीला आधारभूत अशा संज्ञांचा तथा खास मथळयांचा वापर केलेला आहे. त्यानुसार तिस-या प्रकरणात त्यांनी--

१. राजा या संस्थेचा उदय
२. वैयक्तिक कर्तव्ये
३. व्यक्तिगत संरक्षण आणि खाजगी सरंजाम
४. वैयक्तिक निन्यकर्मे
५. करमणूक
६. राजकवि आणि भाट
७. थट्टा मस्करी
८. सल्लामसलत
९. आर्थिक धोरण
१०. लष्करी धोरण
११. राज्य यंत्रणेतील नोकर चाकर--

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

२७. खरे-भिडेआ.,पृ.३२.

२८. उपरोक्त.,पृ.४५.

१२. राजांची वागणूक

१३. राजकुमारांचे शिक्षण

१४. राजाची सहिष्णुता

तसेच पुढील सर्व प्रकरणातही त्यांनी याच पध्दतीचा अवलंब केला असून प्रत्येक प्रकरणात खालीलप्रमाणे मांडणी केलेली आहे.

प्रकरण चारचा मुख्य मथळा "राज्यव्यवस्था"[२९] असा आहे. आणि या प्रकरणाचे विवेचन करताना त्यातील वेगवेगळया प्रकारच्या माहितीनुसार वेगवेगळया प्रकारच्या माहितीच्या विभागाला वेगवेगळी उपनावे किंवा मथळे देण्यात आलेले आहेत. त्यानुसार १) राजाची कर्तव्ये, २) प्रधानाची आवश्यकता, ३) प्रधानांचे महत्त्व, ४) प्रधानांची योग्यता, ५) राजा व प्रजा-संबंध, ६) प्रधानांची कामे व वर्तणूक.

प्रकरण ३ व ४ यातील माहिती शिवाजी महाराजांच्या प्रशासनासंबंधी तथा राजकीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि काही मूलभूत संज्ञा विशद करणारी आहे. पाश्चिमात्य तत्त्वज्ञांनी राजा व ह्या संज्ञेचा उदय कसा झाला, याची यथोचित माहिती आहे. तथापि महाराष्ट्रामध्ये १८व्या शतकाच्या प्रारंभी रामचंद्रपंत अमात्य यांनी राजा म्हणजे काय, तो परमेश्वराने, का आणि कशासाठी निर्माण केला, त्याचे कर्तव्य कोणते, अधिकार कोणते याचे विवेचन केले आहे. तसेच प्रजेसाठी त्याने काय करावे, व्यक्तीगत जीवन कसे जगावे या विषयी एखाद्या महान तत्त्ववेत्याप्रमाणे "आज्ञापत्रा"मध्ये माहिती दिलेली आहे. ही माहिती देत असतानाच राजाने व्यक्तीगत संरक्षण कसे करावे, खाजगी सरंजाम कसा ठेवावा याची सविस्तर स्वीस्तर चर्चा केली आहे. राज्य चालविणे, हे तसे नेहमीच कठीण आणि जबाबदारीचे काम असते. राजाला असे

---

२९. उपरोक्त.,पृ.४५.

बाह्य शत्रू असतात, तसे अंतर्गत शत्रूही असतात. या दोघांच्यापासून राज्य रक्षण करावयाचे असते. त्यासाठी सल्लामसलत आवश्यक असते. पण कोणता सल्ला स्वीकारावा व कोणत्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करावे, याचा निर्णय घेण्याची कुवत राजाकडे कशी असावी, हेही शिवाजी महाराजांच्या उदाहरणावरून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्याच्या लष्कराचे धोरण ठरवणे व त्या काळाला अनुसरून लष्कराचा विश्वास संपादन करणे, तसेच तत्कालीन परिस्थितीला अनुसरून शत्रूच्या तोडीला तोड देईल, असे सतत सुसज्ज लष्कर ठेवणे, अत्यंत महत्त्वाचे होते. शिवाजी राजाने ती खबरदारी कशी घेतली होती. याचे सुंदर विवेचन संतानी केली आहे. जेथे अन्याय दिसताच यथा योग्य शासन करणे, भीड न बाळगणे, पण त्याच बरोबर सतत विश्वास संपादन करणे, लष्कराच्या बाबतीत फार मोलाचे असते, हे योग्य प्रकारे विशद केले आहे.

राज्य यंत्रणेतील नोकर चाकर आणि इतर यांच्या विषयी सुध्दा राजाने नेहमीच जागरूक राहून काम करावयाचे असते. चोरीमारी, हरामखोरी अशा सारख्या विघातक गोष्टींकडे केंव्हाच लक्ष देऊन उपाय योजना करावयाची असते. यासाठी राजाची स्वत:ची वागणूक सर्वांच्या पुढे आदर्श राहिल, असे वर्तन आवश्यक असते. काही वेळा राजाने सत्य जाणून घेण्यासाठी सर्व काही नीट एकूण घेणे, समजून घेणे गरजेचे असते. तर काही वेळा सहिष्णुता दाखवून मोठेपणा मिळवावयाचे असते.

राजा आणि राज्य म्हटले की त्याची स्तुती करणारे वा अकारण गौरव करणारे असतातच पण त्याने राजाचा किंवा राज्याचा कार्यभाग साधत नाही. [illegible] म्हणून राजाने आपल्या पदरी राजकवि व

=-=-=-=-=-=• -=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

राजभाट नेमून चांगल्या कामाच्या प्रकाराची माहिती इतरांना पोहोचविणे महत्त्वाचे असते. त्याच बरोबर राजाने काही बाबीत खबरदारी घेणे सुध्दा आवश्यक असते. त्यांने "दुर्व्यसनाची संभूति होऊं देऊं नये" आणि थट्टा मस्करी करणारे लोक दूर ठेवावे.

आर्थिक धोरणाच्या बाबतीत मात्र राजाने अत्यंत काटेखोर राहून राज्याचा खजिना सतत भरीव राहिल याची खबरदारी घ्यावी, असे सांगितले आहे. पंताच्या मताप्रमाणे खजिना म्हणजेच राज्याचे सर्व काही आहे. आर्थिक धोरण पंतानी "आज्ञापत्रा"त जे काही सांगितले; आहे ते पुढील प्रमाणे आहे--

"आयव्ययें विचार पाहून जेणेंकरून दिवसेंदिवस राज्यांत खजीना होय तें करावें. खजीना म्हणजे राज्याचें जीवन. पडेले प्रसंगी खजीना असल्यानें सर्व संकटांचा परिहार केला जातो. या करितां हा अर्थ आगोदर चित्तांत आणून खजीना संग्रह करावा. यावरी हरी नजर करावी. सेवक लोकांची वेतनें नेमस्त करून त्याप्रमाणे बिलाकसूर चालवावें. कार्य विशेष केल्यानें अथवा दुखी असल्यानें कांहीं बक्षीस म्हणोन द्यावें. परंतु ज्या हुद्यावर जे वेतनाची पोर्टेन असेल त्याच हुद्यावर कार्य विशेष केलें तरी अधिक वेतन न करावें."[30]

"राज्यव्यवस्था" या चौथ्या प्रकरणात राजाची कर्तव्ये सांगितली असून त्यांने राज्यातील हुजूरात, गड, किल्ले, लष्कर, आरमार यांचे नियमन कसे करावे, प्रजेचे रक्षण कसे करावे, न्यायान्याय कसा करावा व देशोदेशीच्या लोकां-बरोबरीचे संबंध कसे ठेवावे, या विषयी माहिती आहे. त्यानंतर राजाला प्रधानाची का आवश्यकता असते, प्रधानाचे प्रमुख कार्य काय असावे, त्याची योग्यता काय असावी

३०. उपरोक्त., पृ.३७-३८.

व राजा आणि त्याचे संबंध कसे असावे, प्रधानाची वर्तणूक कशी असावी, या सर्व गोष्टींचा अगदी बारकाव्याने उहापोह केलेला आहे.[३१]

पाचव्या प्रकरणामध्ये तत्कालीन परिस्थितीला अनुसरून राजाला कर्ज देणारा व राज्यात सावकारी करणाऱ्या सावकारांचे महत्त्व सांगितले आहे. त्याकाळात आजच्या सारख्या बँका अस्तित्वात नव्हत्या. सावकारांच्या करवीच तशा प्रकारची कामे केली जायची. म्हणूनच रामचंद्रपंत म्हणतात--

"साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा. साहुकाराच्या योगाने राज्य आबादान होते. न मिळे त्या वस्तुजात राज्यांत येतात. ते राज्य श्रीमंत होते."[३२]

याच प्रकरणात पुढे असे सांगितले आहे, की सावकारांचा सांभाळ करून राज्यात व्यापार वृध्दी करावी. पण त्याच बरोबर इंग्रज, त्याच बरोबर पोर्तुगीज, फ्रेंच, असे जे परदेशीय सावकार आहेत, त्यांच्यामध्ये व देशी सावकारांच्यामध्ये फरक करावा. परदेशीय सावकार बदेल पणाने वागणारे व स्वत:च्या मताने वागणारे आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारे राज्यात स्थान देऊ नये. जागा देऊ नये. तसेच समुद्रकांठावरील खाडींच्या शेजारची जागा तर कोणत्याही परिस्थितीत देऊ नये. आणि शत्रूच्या मुलखातील सावकार सापडले तर त्यांना शासन न करता त्याचा मान राखावा, म्हणजे त्यांच्यापासून पुष्टा फायदा होईल.

सातवे प्रकरण मराठा राज्यातील वतनदार, देशमुख, देशकुलकर्णी व पाटील, हे एका अर्थाने देशनायकच आहेत, हे सांगते. त्यांनी राजाशी निष्ठेने कसे राहावे, याविषयी राजाने काळजी घ्यावी. वतन लोभाने असे लोक परकीय

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

३१. उपरोक्त.,पृ.४५-५०.
३२. उपरोक्त.,पृ.५४.

सत्तेचा सुध्दा आश्रय करु शकतात. तेव्हा त्या बाबतीत नेहमी दक्ष राहावे. रामचंद्रपंत याविषयी म्हणतात की अशा "लोकांचे संरक्षण परमयुक्तीजन्य आहे."[33]

शिवाजी महाराजानी नवी वतने व इनामे दिली नव्हती. राज्याची नोकरी करणाऱ्यांना पगार देण्याची व्यवस्था केली होती. पण त्यांच्यानंतर आणि विशेषत: संभाजीमहाराजाच्या वधानंतर औरंगजेब बादशहाच्या प्रचंड विरोधाला तोंड देऊन मराठा राज्य संरक्षण करणे महत्त्वाचे ठरल्याने राजाराम महाराजानी वतने व इनामे देऊन मराठा सरदारांना औरंगजेबाच्या विरुध्द लढण्यासाठी नवी प्रेरणा दिली होती. रामचंद्रपंत त्या सर्व इतिहासाचे साक्षीदार होते. त्यातील वाईट अनुभवाची सुध्दा त्यांना कल्पना होती. त्याकाळात त्यांनी सुध्दा वतने व इनामे मिळवली होती.

पण मराठा राज्यातील त्याकाळची ती अवस्था म्हणजे काळाची गरज होती. आणि त्याच अवस्थेचे पुनरुज्जीवन करावे, असे काही आवश्यक नव्हते. उलट वतनाच्या आणि इनामाच्यामुळे मराठा राज्यात व सरदारात गैरसमज निर्माण झाले होते. म्हणून ही सर्व परिस्थिती समोर ठेवून सातव्या प्रकरणामध्ये "आज्ञापत्रा"त रामचंद्रपंताने नवी वतने देऊ नयेत, असे सांगून टाकले आहे.[34] अशी वतने दिल्याने कोणते वाईट परिणाम होतात याचाही खुलासा, केलेला आहे. तथापि धर्मवृत्ती जागवणाऱ्या सद्ब्राम्हणांना धर्मार्थ भूदान करावे, हे अवर्जून सांगितले आहे. आणि तसे भूदान करण्यात "पुण्य अनंत आहे" असे सांगितले आहे.

रामचंद्र पंतांचा हा उपदेश किंवा या संबंधीचे विचार अगदी मध्ययुगीन काळातील आहेत. आणि त्याबाबतीत त्यांचे धोरण पारंपारिक धर्मवृत्तीला धरुन आहे. मानवी सामर्थ्यावर त्यांचा विश्वास नव्हता. देव आणि दैव, पाप आणि पुण्य

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

३३. उपरोक्त., पृ.५४.

३४. उपरोक्त.,पृ.५८-५९.

यांच्या भोव-यातच ते सापडलेले होते. म्हणूनच या बाबतीत त्यांनी "आज्ञापत्रा"त पुढील प्रमाणे लिहिले आहे--

"तशींच थोर थोर जागृत देवतायतनें, सत्पुरुषांचे मठ, समाधिस्थानें जेथें पूजा नैवेद्य यात्रादि अन्नशांति नियमित आहे असे स्थळींही, ग्राम अथवा भूमि देणे ती यावी आणि दिधलियावर कसाही आपत्कालीं पडो, प्राणापर्यंत संकट घडो, परंतु इहलोकीं सुख क्षणीक आहे, हें जाणून परलोकाचा संपूर्ण चित्तांत आणून दिधलियामध्ये आचमनभर उदक तेंही लीलाप्रसंगेकरूनही अभिलाषूं नये. असे जे सधैर्य पापभीरु राजे आहेत त्यांचे संकट तो ईश्वरच परिहार करितो."[३५]

आज्ञापत्रातील शेवटची दोन प्रकरणे म्हणजे आठवे व नववे, ही प्रकरणे राज्य संरक्षणाच्या दृष्टीने लिहिली असून त्यामध्ये "गड, कोट, किल्ले"[३६] हे आठवे प्रकरण व "आरमार"[३७] हे नववे प्रकरण मराठा राज्याचे खास वैशिष्ट्ये सांगणारे आहे. मराठा राज्यात त्याकाली गड,कोट व किल्ले यांना फार महत्त्वाचे स्थान होते. हे गड नसते तर मराठा राज्य निर्माण करता आले नसते. तसेच जतन करताही आले नसते. मध्ययुगीन कालाची ही परिस्थितीच होती. म्हणूनच रामचंद्रपंत म्हणतात, "हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनीं गडांवरूनच निर्माण केले."[३८]

"आज्ञापत्रा"त गडाचे महत्त्व, व्यवस्था, रचना याविषयी अत्यंत सुक्ष्मपणे आवश्यक ती सर्व माहिती दिलेली आहे. आणि औरंगजेबासारख्या जबरदस्त शत्रू-पासून सुध्दा गड आणि किल्ले यांच्यामुळे संरक्षण करून घेतले, हे दाखविले आहे.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

३५. उपरोक्त., पृ.५९-६०.
३६. उपरोक्त.,पृ.६१.
३७. उपरोक्त., पृ.५४.
३८. उपरोक्त., पृ.६१

यासंबंधी "आज्ञापत्र" सांगते-- "औरंगजेबासारखा महाशत्रू चालून येऊन विजापूर भागानगरांसारखी महासंस्थाने आग्रमिली, संपूर्ण तीस बत्तीस वर्षेपर्यंत या राज्याशी अतिश्रम केला, त्यांचे यत्नास असाध्य काय होते ? परंतु राज्यात किल्ले होते म्हणून अवशिष्ट तरी राज्य राहिलें."[३९]

मराठा राज्य निर्मितीच्यावेळी व तद्नंतरही लष्करातील आधुनिक युगाची शास्त्रास्त्रे येईपर्यंत गड, कोट आणि किल्ले यांचे महत्त्व अनन्यसाधारण होते. त्याकाळी, असे गड कोट म्हणजे संरक्षणाचे खात्रीचे ठिकाण समजले जाई. गड, कोट आणि किल्ला ही संरक्षणाची व शत्रूच्या विरुद्ध लढण्यासाठी आक्रमक पवित्रा घेण्याची तथा बचावात्मक स्थळाची निवड करण्याची मुख्य ठिकाणे असत. त्याखेरीज इलाजच चालत नसे. काही वेळा मात्र अशा ठिकाणाचे अधिकारी जर दुबळे ठरले वा द्रोही झाले तर धोका उत्पन्न होत असे. शिवाय अशा ठिकाणी स्वसंरक्षणासाठी खास जागा निर्माण केल्या नाही, तरी अडवणी उत्पन्न होत असत. म्हणूनच गडाची व्यवस्था व रचना, कशी असावी याकडे "आज्ञापत्रा"त महत्त्वपूर्ण माहिती दिलेली आहे. गडावरच्या अधिकाऱ्यांची नेमणूक, त्यांची वर्तणूक त्यावरची देखरेख, याप्रमाणेच त्यांनी आपले लोक व शत्रूचे लोक ओळखण्यासाठी व त्यांच्या संबधात वागण्याविषयी नियम घालून दिलेले होते, हे नमूद केलेले आहे. नवीन किल्ला बांधताना त्याच्या समोर दुसरा उंच पर्वत किंवा डोंगर असू नये, हे स्पष्ट केले आहे. तट आणि बुरूज इत्यादी मजबूत बांधावे, नेहमीचे दरवाजे व चोर दिंड्या म्हणजे चोर वाटा कशा असाव्या, भुईकोट व खंदक कसे असावे, गडाभोवती गस्त कशी घालावी, आणि गडावर धान्याचा साठा, दारुगोळा, पाणी पुरवठा कसा असावा, ही सर्व माहिती अगदी योग्य प्रकारे दिली आहे. गडावरील तळघर, त्यात ठेवली जाणारी लष्कराला आवश्यक असणारीसाधने, दारुगोळा वगैरे संबंधी भरपूर माहिती आहे.

---

३९. उपरोक्त.,

विशेष म्हणजे पावसाळ्यात हत्यारे गंजू नोत म्हणून तेल व मेण यांचा वापर कसा करावा व सदासर्वदा गड, कोट व किल्ले यांचे संरक्षण कसे करावे व त्याद्वारे राज्य रक्षणाचे कार्य तडीला कसे न्यावे, ही सर्व माहिती यथार्थपणे दिलेली आहे.

"आरमार" या शीर्षकाच्या प्रकरणात शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठा आरमाराची माहिती आहे. मराठा आरमार म्हणजे आधुनिक भारताला सुध्दा एक वरदानच होते. कारण शिवाजी महाराजानी आरमार निर्माण केले नसते तर पाश्चिमात्य राष्ट्रांनी महाराष्ट्राच्या पश्चिम किना-या-वरूनच भारतात प्रवेश मिळविला असता. आणि भारत सहजासहजी युरोपियन लोकांच्या ताब्यात गेला असता.

शिवाजी महाराज व मराठ्यांचे आरमार याविषयी माहिती देताना "आज्ञापत्रा"मध्ये १) आरमारचे महत्त्व, २) आरमाराची व्यवस्था, ३) व्यापारी गलबते, ४) नाविक युध्द, ५) आरमारी छावणी अशी मांडणी ग.ह. खरे यांनी केलेली आहे.[४०] अर्थात मूळच्या "आज्ञापत्रा"त आरमारा विषयी अशी पृथकपणाने माहिती दिलेली नसली तरी त्यातील वरील मांडणी खरे यांनी योग्य विषयवार केली आहे. म्हणूनच खरे यांना सुध्दा तशी विभागणी करणे सोपे गेले आहे. रामचंद्र पंतानी तत्कालीन परदेशीय व्यापा-यांचे समुद्रावरील वर्चस्व लक्षात घेऊन व शिवाजी महाराजांना त्या परकीय सत्तांना तोंड देताना आलेल्या अडचणी लक्षात घेऊन, आरमाराचे महत्त्व ओळखले होते. समुद्रावर ज्याचा अधिकार तोच त्याचा मालक आणि ही मालकी, आरमाराशिवाय शक्य नव्हती. म्हणूनच संभाजी राजांना या आरमाराचे महत्त्व सांगताना "आज्ञापत्रा"त रामचंद्रपंत म्हणतात—

४०. उपरोक्त., पृ. ७४-७९.

"आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. जसें ज्यास अश्वबल तसी त्याची व बुद्धिप्रभा आहे, तद्वत ज्याच्या जवळ आरमार त्याचा समुद्र.या-करिता आरमार अवश्यमेव करावें. चालीच्या गुराबा बहुत थोर ना बहुत लहान, ऐशिया मध्यरीतीनें सजाव्या, तशींच गलबते करावीं. थोर बहुत वासरे जागांत (?) जे वाऱ्याविणें प्रयोजनाचेंच नव्हे असें करावयाचें प्रयोजन नाहीं. कदाचित् एक दोन सलाबतीमुळें केले तरी जें आरमार करावें त्यावर मर्दानी मारक माणूस, भांडी, जंबेर, बंदुका, दारूगोळी, होके, आदिकरून आरमारी प्रयोजनी सामान यथेष्ट बरे सदुते करावें."[४१]

युरोपियन लोकांच्या भारतावरील तत्कालीन प्रभावामुळे भारतातील राज्यकर्त्यांच्या समोर मोठे प्रश्न चिन्ह निर्माण झाले होते. भारतात प्राचीन काळी आरमार असल्याचे भारतीय इतिहासात दिसत असले तरी मध्ययुगीन काळामध्ये आणि विशेषत: युरोपियन लोकांचे समुद्रमार्गे भारतात आगमन झाले, त्यावेळी भारतामध्ये भारताचा समुद्र रक्षण करावे, असे आरमार नव्हते. शिवाजी महाराजांच्या उदयाच्या वेळी महाराष्ट्र व पश्चिम भारतात देशी आरमार नव्हते. शिवाजी महाराजानी आदिलशाही प्रदेश जिंकून नवराज्य निर्मितीचा उद्योग होती घेत असताना त्यांच्या शत्रूना इंग्रजासारख्या समुद्र-सत्तेवरील परकीयांची मदत मिळाली होती. या परकीय समुद्र सत्तेवरील शिरजोरांना व जंजिऱ्याच्या सिद्दीला, कसे तोंड द्यावयाचे, हा महाराजांच्या पुढे मराठा राज्य स्थापन करण्याच्या वेळी भेडसावणारा प्रश्न होता. म्हणूनच त्यांनी यथाशक्ती प्रयत्न करून इ.स.१६५८ मध्ये कल्याण-भिवंडी येथे स्वत:चे आरमार निर्माण केले.[४२] रामचंद्र पंत कर्ते झाल्यावर त्यांनी महाराजांच्या या कार्याचे महत्त्व ओळखले होते. तसेच समुद्र संरक्षण करणे आवश्यक आहे, हेही अनुभवाने समजून घेतलेले होते. म्हणूनच त्यांनी आपल्या "आज्ञापत्रा"त आरमारा-संबंधी शेवटच्या प्रकरणात महत्त्वपूर्ण माहिती दिलेली आहे.

---

४१.उपरोक्त., प१. ७४.

४२. Sarkar,J.N.,Shivaji and His Times, Orient Longman Ltd.,New Delhi,1973,p.245.

आरमाराच्या सामर्थ्यावर आपल्या राज्याच्या भुप्रदेशालगतचा समुद्र आपल्या ताब्यात ठेवता येतो, ही बाब समुद्रकाठांवरील सर्वच राज्यांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. महाराष्ट्राचा पश्चिम भाग, हा फार मोठा सागर किनारा आहे. त्याचे संरक्षण करणे म्हणजे समुद्र सत्तेवरील परकीय सत्तांना थोपवून धरणे, हे होय. त्यासाठी त्यांच्या तोडीस तोड, असे आरमार निर्माण करणे व ते जय्यत तयारीने ठेवणे अगत्याचे असते. म्हणूनच पंत म्हणतात--"आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे."[४३] त्याचे हे वाक्य अक्षरशः खरे आहे. ज्या-च्याजवळ आरमार त्याचा समुद्र असा, तो काळ होता. आणि कोल्हापूरचे राज्य पश्चिमेकडे समुद्रापर्यंत पसरलेले होते. म्हणून संभाजी महाराजांना त्या बाबतीत त्यानी योग्य प्रकारे मार्गदर्शन केले आहे.

आरमार कसे ठेवावे, त्याची व्यवस्था कशी राखावी, कौवारी कशी करावी, आरमारावरील अधिकाऱ्यांना कसे अधिकार द्यावे, तनखा द्यावा आणि त्यांच्याकडून कामे कशी करुन घ्यावी, एकात कशी कबूल करुन घ्यावी, वगैरेविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. त्याच बरोबर गनीमांच्या आरमाराची जाणा ठेवून त्यासंबंधी कसे वागावे, हेही सांगितले आहे. पुढे वेळ पडल्यास आरमारी युध्द म्हणजे नाविक युध्द कसे करावे, त्यावेळी कोणते धोरण स्वीकारावे, या संबंधी फार उपयुक्त माहिती दिलेली आहे.

अर्थात आरमाराचा वापर जसा संरक्षणासाठी करणे महत्त्वाचे आहे, तसेच त्याद्वारे त्यातील एक विभाग व्यापारी गलबते म्हणून सुध्दा वापरता येतो व त्याद्वारे राज्याच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावता येतो. हेही स्पष्ट केले आहे. व्यापारी गलबतांचा फायदा तोटा लक्षात घेऊन, फायदा जास्त कसा होईल याकडे

---

४३. खरे-भिडेआ., पृ.७४.

लक्ष दिले आहे. जकात कशी आणि किती वसूल करावी, गनीमांच्या मुलकातील मालाबद्दल कोणते धोरण स्वीकारावे व गनीमांची तरांडी किंवा जहाजे पकडल्यावर नेमके काय करावे हेही सांगितले आहे. शेवटी आरमारी हाकण्या कशा, कोठे ठेवाव्या, समुद्रातील तुफान आणि वादळ यावयाच्या वेळी काय करावे, गनीम, चोर व दगाबाज यांच्यापासून संरक्षण कसे करावे, हे सर्व यथोचितपणे कथन केले आहे. तसेच जहाज बांधणीसाठी लागणारी लाकूडफाटा सामुग्री, म्हणजे सागवान आदिवृक्ष अंबा, फणस यांच्या सारखी झाले, या सर्वांचे जतन, संरक्षण व लागवड कशी करावी, व ती झाडे जहाज बांधणीसाठी कशी वापरावी, याचीही बारीकसारीक इत्थंभूत हकीकत "आज्ञापत्रा"त दिलेली आहे. आणि राज्य रक्षणासाठी आरमाराचे महत्त्व पटवून दिलेले आहे. शेवटी "आज्ञापत्रा"च्या अखरी पंतानी संभाजी राजांना मुजरा करुन त्यानी मातोश्री ताराबाई यांच्यामध्ये अंतर पडू देऊ नये व प्रतिदिन राज्यवृध्दी व्हावी असा आशावाद व्यक्त करुन, आपण "आज्ञापत्रा"चे लेखन एक सेवाकार्य समजून पूर्ण केल्याचे कथन केले आहे.[४४]

**रामचंद्रपंतांच्या संबंधीची मते :**

महाराष्ट्रातील इतिहासकारांनी व विद्वानांनी रामचंद्र पंताच्या "आज्ञापत्रा"वर त्या मानाने भरपूर लिहिले आहे व आपापली मतेही व्यक्त केलेली आहेत. रियासतकार गो.स. सरदेसाई या "आज्ञापत्रा" विषयी म्हणतात—

"शिवाजीच्या वेळेपासून जे जे अनुभव रामचंद्रपंतास सर्व लोकांच्या सहवासांत मिळाले किंवा नानातऱ्हेच्या लेखांत वेगवेगळे गोंवले गेले, ते सर्व परिश्रमपूर्वक एकत्र करुन आपल्या उतार वयांत मराठेशाहीला आपल्या हातची देणगी म्हणून त्या थोर पुरुषानें हा लेख लिहून ठेविला आहे. आंतील विषय पाहिला म्हणजे त्यांतील

---

४४. उपरोक्त., पृ. ७९.

उपदेश शिवाजी महाराजांच्या उदाहरणांवरून निघालेला दिसतो. म्हणजे महाराजांच्या हुकुमांत, उदगारांत वर्तनात व सहवासांत ज्या गोष्टी अमात्यास दिसल्या त्यांवाच संग्रह त्याने या प्रकरणांत केला आहे, असे मानण्यास हरकत नाहीं. विषय व त्याची मांडणी पाहतां पन्नास वर्षांच्या घडामोडीचें चित्र पंतांच्या डोळयासमोर असलेलें दिसतें. राज्य चालविणारास जें काहीं नियम, धोरणे व बारीक बारीक तपशील सदैव ध्यानांत ठेवावे लागत, ते सर्व अत्यंत सूक्ष्म व मार्मिक रीतीनें त्या त्या प्रकरणांत गोवून लिहिले आहेत; आणि ते वाचतांना आपण प्रत्यक्ष शिवछत्रपतींचीच व्यापक व दूरदृष्टीची धोरणें वाचीत आहोत, असे वाटल्याशिवाय रहात नाही."[४५]

द.वा. पोतदारांनी सुध्दा आपल्या टिकात्मक दृष्टीकोनातून "आज्ञापत्रा" संबंधी पुढील प्रमाणे मत व्यक्त केले आहे[४६]--

"रामचंद्र नीळकंठांची ही राजनीति म्हणजे मराठी ऐतिहासिक वाङ्मयां-तील एक अमूल्य रत्न आहे. या नीतींतील प्रत्येक शब्द नि शब्द महत्त्वाचा, अति महत्त्वाचा असून, ही नीति नीट मननपूर्वक वाचल्यावर शिवाजी महाराजांच्या चरित्राचें रहस्य उत्तम त-हेनें ध्यानीं येतें. या नीतींतील प्रत्येक मुद्दा घेऊन त्यावर स्वतंत्रपणे, साधार व सप्रमाण विवेचन करून, ग्रंथच लिहिणें अवश्य आहे. तसा प्रयत्न कोणी शिवचरित्रजिज्ञासूनें अवश्य केला पाहिजे.

रामचंद्रांची राजनीति संपूर्ण दिसत नाहीं. तथापि जी मिळाली आहे तिचें काळजीपूर्वक परिशीलन केलें तर ती भाषा दृष्टीनें जशी सुंदर आहे तसेंच तींतील राजनीति-नैपुण्यहि वर्णनीय आहे."[४६]

गो.स. सरदेसाई व द.वा. पोतदार, या दोघांच्याप्रमाणेच "आज्ञापत्रा"चे महत्त्व विशद करताना का.न. साने यांनी मल्हार रामराव चिटणीस लिखित

---

४५. जोशी,प्र.न.,संपा.रामचंद्र नीळकंठकृत मराठेशाहींतील राजनीति:आज्ञापत्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६०, पृ. ६९-७०.

४६. उपरोक्त., पृ. ७०.

मराठयांच्या बखरीच्या तुलनेत "आज्ञापत्र" कसे महत्त्वपूर्ण आहे ते पुढील प्रमाणे सांगितले आहे--[४७]

जुन्या मराठी गद्यग्रंथांत दोन ग्रंथ राजनीतीवर रचलेले आढळतात. एक रामचंद्र नीळकंठ अमात्य यांचा, दुसरा मल्हार रामराव चिटणीस यांचा- पैकी रामचंद्रपंत अमात्य हे वडील राजनीतिकार होत. त्यांनी शककर्ते थोरले शिवाजी-महाराज यांच्यापासून तो कोल्हापूरकर संभाजी महाराजांपर्यंत सर्व कारकीर्दी पाहिलेल्या होत्या. राजाराम महाराजांच्या वेळीं तर स्वराज्याचा मूळ प्रदेश जो घांटमाथा तो सर्व -इकडे कोल्हापूर विशाळगडापासून तो थेट भीमा नदीपर्यंत त्यांच्याकडे सोपवून राजारामसाहेब तंजावर प्रांती चन्दीस (जिंजीस) गेले. रामचंद्र-पंतांनी छत्रपती शिवाजीपासून सर्व कारभार कसा चालत होता तें पाहिलेलें होते. राजारामाच्या वेळीं तर ते खरोखरीच "सर्व राज्यकार्यधुरंधर" झाले होते; व औरंगजेब महाबळी सर्व दक्षिणभर धिंगाणा घालीत असतां त्यांनीं स्वराज्याचा बचाव उत्तम प्रकारें केला. अशा कर्त्या पुरुषानें स्वतःच्या माहितीनें व अनुभवानें सिध्द झालेली राजनीति राजाबाईचे पुत्र संभाजीमहाराज यांस उपदेशिली."

अशा रीतीने रामचंद्रपंताचे "आज्ञापत्र" शिवाजी महाराज व मराठा राज्याच्या राजनीतीचा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. आणि यामध्ये राजनीतीच्या तत्त्वज्ञानाबरोबर, ती तत्त्वे प्रत्यक्षात कशी आणावी याचेही व्यावहारिक विश्लेशन केलेले आहे. म्हणूनच रामचंद्रपंताचे हे "आज्ञापत्र" म्हणजे मराठयांच्या राजनीतीचा एक उत्तम राजकीय ग्रंथ आहे.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

४७. उपरोक्त., पृ. ७०-७१.

# - प्रकरण ८ -

## रामचंद्रपंत: उपसंहार

रामचंद्रपंत अमात्य यांचे नाव मराठा इतिहासात अजरामर झालेले आहे. सामान्यत: एखाद्याचे नाव अजरामर होते, ते कर्तृत्वामुळेच होत असते. रामचंद्रपंत अमात्य यांचे कर्तृत्व तसे मराठा राज्यात उदंड असेच होते. इ.स. १६५० मध्ये जन्मलेले रामचंद्रपंत वयाच्या १८व्या वर्षी म्हणजे इ.स. १६६८ मध्ये शिवाजी महाराजांच्या कृपेने मराठा राज्याच्या सेवेत सिंधुदुर्गचे सबनीस म्हणून दाखल झाले. त्यांच्या वडिलांचे शिवाजी महाराज व शिवाजी महाराजांचे घराण्याशी जवळचे आणि विश्वासाचे संबंध होते. पण केवळ त्यासंबंधावर पंताचा उत्कर्ष व्हावा व त्यांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत म्हणजे इ.स. १७१६ पर्यंत, मराठी राज्याची सेवा करावी, असे काही अवलंबून नव्हते. त्यासाठी त्यांच्या स्वत:च्या कर्तृत्वाची जोड हवी होती. आणि, ते उदंड कर्तृत्व त्यांनी इ.स. १६६८ ते इ.स. १७१६ दरम्यानच्या जवळ जवळ ४८ वर्षांच्या कारकीर्दीत सिध्द केले. म्हणूनच मराठा इतिहासांमध्ये त्यांचे नाव, एक कर्तृत्ववान मोहरा, या नात्याने चिरंतन झालेले आहे.

### शिवाजी व संभाजीच्या काळातील कार्य:

रामचंद्रपंताची कारकीर्द सिंधुदुर्गच्या सबनीसीपासून सन १६६८ मध्ये सुरु झाली. तो काळ मराठयांच्या दृष्टीने अत्यंत कठीण असा होता. विजापूरची अदिलशाही आणि दिल्लीच्या मोगलांची साम्राज्यशाही, या दोन्ही जबरदस्त अशा इस्लामी सत्ताला तोंड देऊन त्यावेळी शिवाजी राजे मराठा राज्य निर्मितीचा उद्योग करीत होते. त्यांना त्यावेळी कर्तृत्ववान व सचोटीचे तसेच जीवाला जीव देतील, असे विश्वासू लोक हवे होते. रामचंद्रपंताचे वडिल निळोपंत आणि पूर्वज यांनी आपली निष्ठा व विश्वास त्या कामी सिध्द केलेला होता.

आणि आपल्या वडिलांच्या सहवासात वाढत असताना, पंतानी शिवाजी महाराजांच्या बरोबर, कसे रहावे व त्यांची सेवा कशी करावी, हे समजून घेतलेले होते. म्हणूनच सिंधुदुर्गाची सबनीसी त्यांचे थोरले बंधू नारोपंत यांच्या ऐवजी त्यांना मिळाली होती. म्हणजे वडिल बंधूच्या अगोदर रामचंद्र पंताचा मराठा राज्याच्या सेवेत प्रथम प्रवेश झाला होता.

इ.स. १६७४ मध्ये शिवाजी राजानी राज्याभिषेक करून घेऊन आपले अष्टप्रधान मंडळ जाहीर केले. या पहिल्या प्रधानमंडळामध्ये रामचंद्रपंताची नियुक्ती शिवाजी महाराजांनी "अमात्य" म्हणून केलेली होती. वास्तविक पाहता, पंताचे वडिल इ.स. १६७२ मध्ये मरण पावल्यावर त्यांच्याकडे असलेले मुजुमदार पद म्हणजे अमात्य पद शिवाजी राजानी नारोपंत व रामचंद्रपंत या दोन मुलांमध्ये वाटून दिलेले होते.[१] आणि नारोपंत हे निळोपंताचे ज्येष्ठ चिरंजीव होते. तेव्हा या देशातील परंपरेनुसार शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात रामचंद्रपंताच्या ऐवजी नारोपंताची वर्णी लागावयास हवी होती. पण तसे न होता रामचंद्रपंतानाच "अमात्य" म्हणून नियुक्त केले होते. आणि ही बाब पंताच्या समर्थ अशा कर्तृत्वाची नांदी होती, असे मानावयास काही हरकत नाही.

शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात पंताची "अमात्य" म्हणून नेमणूक झाल्यावर त्यांनी त्या पदावर काही काळ कामही केले. पण त्यांना त्या पदाला इ.स. १६७७ मध्ये मुकावे लागले होते. त्यानी ते पद रघुनाथपंत हणमंते यांना दिले. रामचंद्र पंताच्याकडून हे पद का काढून घेतले व ते पद काढून घेतल्यानंतरही पंतानी एकनिष्ठपणे मराठा राज्याची सेवा बिन तक्रार

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

१. अ) गर्गे, स.मा., उपरोक्त., पृ. ८२.

ब) खरे-भिडेआ., पृ. १४.

का व कशासाठी केली, याविषयी कागदपत्री काही पुरावा असल्याचे आढळत नाही. इतिहासकारांनी सुध्दा या बाबतीत मोघमपणेच विधाने केली आहेत. वा.सी. बेंद्रे यांनी सुध्दा या घटनेवर भाष्य केलेले नाही. एरवी संभाजी महाराजाच्या कालातील पंताच्या कारकीर्दीला बेंद्रे यांनी "नाकर्तेपणा"[२] कारकीर्द असे संबोधले आहे.

परंतु शिवाजी महाराजाच्या कालात पंताचे "अमात्यपद" गेले असले तरी पंताचे महाराजांच्या जवळचे वजन कमी झाले होते, असे दिसत नाही. तसे असते तर आपल्या अंत्य समयी रामचंद्र पंताविषयी शिवाजी महाराजांनी चांगले उद्‌गार काढलेही नसते.[3] तेव्हा शिवाजी महाराजांच्या कालात रामचंद्रपंताची अप्रतिष्ठा झाली होते, असे अनुमान काढता येत नाही. किंवा ते आपल्या कर्तव्यात कमी पडले होते, असेही म्हणता येणार नाही. किंबहुना मराठा राज्य निर्मितीमध्ये शिवाजी राजे सांगतील, तसे वागून राज्य वृध्दीस पोषक असे, पडेल तें काम करण्यातच रामचंद्र पन्ताचे मोठेपणा होते.

राजमंडलातील कर्ते म्हणूनची कारकीर्द:

संभाजी महाराजांच्या कालखंडामध्ये रामचंद्र पंताना सन १६८१ मध्ये "सचिव" पद मिळाल्याचे आपण मागे पाहिलेच आहे.[४] या "सचिव" पदावर रामचंद्रपंत इ.स. १६८५ पर्यंत होते. त्यानंतर संभाजीच्या कारकीर्दीमध्ये त्यांच्याकडे कोणती कामगिरी होती, या विषयी माहिती मिळत नाही. संभाजीराजे यानी नाकर्तेपणामुळे त्यांना "सचिव" पदावरुन काढले, असे वा.सी. बेंद्रे यांचे मत आहे.[५] पण वा.सी. बेंद्रे यांच्या या मताला सेतु माधवराव पगडी यानी विरोध केला आहे.[६]

२. बेंद्रे संभाजी., पृ. १००-१०१.
३. वाकसकर, वि.स., संपा. उपरोक्त., पृ. ८२.
४. प्रस्तुत प्रबंध मधील. पृ. 63
५. अ) बेंद्रे संभाजी., पृ. १००-१०१.
   ब) बेंद्रेराजाराम., पृ. ३१.
६. पसेतुहिंस्वमो., पृ. १०८-१०९.

पण, असे जरी असले तरी, म्हणजे बेंद्रे यांचे मत सेतु माधवराव पगडी यांनी खोडून काढले असले तरी, एक गोष्ट निर्विवाद आहे, ती ही की, रामचंद्रपंत इ.स. १६८५ ते इ.स. १६८९ मधील कालात, म्हणजे संभाजीच्या वधापर्यंत मराठा सत्तेतील कोणत्याही महत्त्वाच्या हुद्यावर नव्हते. तथापी ही बाब लक्षात घेत असताना, हेही समजून घेतले पाहिजे, की रामचंद्रपंत तशाही कालात मराठा राज्याशी एकनिष्ठ राहिलेले आहेत. त्याकाळामध्ये अनेक मातब्बर विश्वासू लोकांपैकी काही लोक मोगलांच्याकडे निघून गेलेले होते, आणि पुन्हा राजारामाच्या कालात परत आले होते. रामचंद्रपंत तशा वृत्तीचे नव्हते. किंबहुना त्यांची सर्व निष्ठा छत्रपति घराण्याशी आणि मराठा राज्याशीच होती. म्हणूनच संभाजी महाराजांच्या वधानंतर मराठा राज्यावर औरंगजेबाच्या आक्रमणामुळे जे अपूर्व संकट आले होते, त्या संकट समयी, राजाराम महाराज व इतर कर्त्या मराठा सरदारांनी त्यांच्याकडे मराठा "राजमंडळाचे" प्रमुख पद व "हुकूमतपन्हा" हा सर्वाधिकार दिलेला होता. पंताचा "हुकूमतपन्हा" हा अधिकार खुद्द छत्रपतीनी सुध्दा मान्य करावा, अशा स्वरूपाचा होता. [७] याचाच अर्थ असा, की संभाजी महाराजांच्या वधानंतर मराठा राज्याच्या संरक्षणाची प्रमुख जबाबदारी रामचंद्रपंताच्यावर सोपविण्यात आलेली होती.

छत्रपती संभाजी यांच्या वधानंतर त्यांचा मुलगा शाहू परंपरेनुसार छत्रपती व्हायला हवा होता. पण तो व त्याची आई येसूबाई यांना मोगलांनी पकडून नेऊन औरंगजेबाच्या सक्त कैदेत ठेवले होते. इकडे मराठा राज्यात संभाजीच्या-नंतर तशा परिस्थितीत राजाराम महाराजाना छत्रपती करावे, का करू नये, असा संभ्रम निर्माण झाला होता. महाराष्ट्रात त्यावेळी देशाच्या इतर भागा-प्रमाणेच मध्ययुगीन कालाच्या रूढी व परंपरा चालू होत्या. राजाशिवाय राज्य

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

७. सगोसराजाराम., पृ. ४२.

नाही, आणि राजा नसेल तर सैन्य लढूही शकत नाही, अशी ती परिस्थिती होती. तेव्हा त्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी छत्रपतीच्या गादीवर संभाजीचा मुलगा शाहू याच्या गैर हजेरीत राजाराम महाराजाला छत्रपती करण्याचा धाट घातला होता. हा पुढाकार नेमका कोणी घेतला होता, या संबंधीची कागदपत्रे तेवढी स्पष्ट नाहीत. अर्थात राजाराम महाराजांनी, छत्रपती पद न स्वीकारता, छत्रपती पदाचा अधिकार वापरुन मराठयांचं नेतृत्व केले. हा प्रकार सुध्दा नेमका कसा घडला, आणि त्या पाठीमागे कोणत्या शक्तीची प्रेरणा होती यांचाही तसा उलघडा तत्कालीन अस्सल कागदपत्रांच्या अभावी होऊ शकत नाही. परंतु आतापर्यंत उपलब्ध झालेल्या सर्व साधनांच्या आधारे हे स्पष्ट आहे, की राजाराम महाराजानी मोठेपणा दाखवून छत्रपती पदाचा स्वीकार न करता मराठयांचे नेतृत्व केले. आणि आपला अनुभव व वय कमी असल्याचे लक्षात घेऊन मराठा "राजमंडळा"च्या वतीने छत्रपती व मराठा राज्याशी एकनिष्ठ असलेल्या रामचंद्र पंताना मराठा राज्याचे "सर्वाधिकारी" म्हणून नेमले.[८]

पुढे औरंगजेब बादशहाने शाहू व त्याच्या आईच्या अटकेनंतर शिवाजी महाराजाच्या घराण्यात, छत्रपती पदाचे वारस म्हणून राहिलेले शिवाजी महाराजाचे धाक्टे चिरंजीव, राजाराम व त्यांचे कुटुंबीय यांना पकडण्याचा अटोकाट प्रयत्न केला. ते पकडले गेले असते तर कदाचित मराठा राज्य त्यावेळी औरंगजेबाने जिंकले असते. पण औरंगजेबाला तसे यश येऊ नये व छत्रपतीच्या गादीचा वारस, हा कोणत्याही परिस्थितीत सुरक्षित राहिला पाहिजे, अशी सर्व खबरदारी रामचंद्रपंतानी मराठा राजमंडळाच्यावतीने घेतली. त्यासाठी मराठा राज्याच्या कर्नाटकातील तंजावर बाजूच्या प्रदेशातील जिंजी येथे राजारामाला पाठवण्याची योजना आखली. ती यशस्वी करुन दाखविली.

---

८. उपरोक्त.

पण मोगलांनी राजारामाचा पिच्छा सोडला नाही. तथापि मोगलांचे सामर्थ्य जर विभागले गेले नसते आणि सर्व मोगल सामर्थ्य व सैन्य राजारामाच्या पाठलागाच्या कामी लागले असते, तर मोठी कठीण परिस्थिती झाली असती. ती तशी होऊ नये व मोगल सामर्थ्य विभागले जावे अशी पंतानी मराठा राज्याचे "सर्वाधिकारी" म्हणून वेळीच खबर घेतली. आणि राजारामाला पन्हाळयाहून इ.स. १६८९ मध्ये गुप्तपणे जिंजीकडे पाठवत असतानाच महाराष्ट्रात औरंगजेबाच्या विरुध्द तीव्र संघर्ष उभा केला. मोगल सैन्याची दाणादाण उडून जाईल, अशी सर्वत्र व्यवस्था केली. त्यासाठी मराठा सरदारांना प्रेरणा दिली, इनामे दिली, वतने दिली. कोणत्याही परिस्थितीत राजाराम महाराज मोगलांच्या हातात पडू नये, याची खबरदारी घेतली. पंताची ही कामगिरी मराठयांच्या इतिहासात अत्यंत मोलाची व महत्त्वपूर्ण अशी आहे. या कालखंडात मराठयांच्यामध्ये आपआपसात गैरसमज झाले, मतभेद झाले, काही प्रमाणात एकमेकाविरुध्द वैरही वाढले. हे जरी खरे असले तरी, त्या सर्व परिस्थितीवर मात करुन राजाराम महाराज व मराठा राज्य यांचे रक्षण करण्यात रामचंद्र पंताना यश आले आहे.

रामचंद्रपंताची राजाराम महाराजांच्या महाराष्ट्रातील गैरहजेरीच्या वेळची कारकीर्द, वाखाणण्यासारखी झाली होती. स्वाभाविकच त्यांचा बहुमान करण्याच्या इराद्याने राजाराम महाराजानी जिंजीहून परत आल्यावर पंताच्याकडे "हुकूमतपन्हा" या त्यांच्या अधिकाराबरोबरच शिवाजी महाराजांच्या कालातील "अमात्य" पदाचा अधिकारही इ.स. १६९७ मध्ये दिला होता. दुर्दैवाने जिंजीहून परत आल्यावर राजाराम महाराज फार काळ जगले नाहीत. औरंगाबादकडच्या

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

उत्तरेकडील मोहिमेवरून परत येऊन इ.स. १७०० मध्ये आजारी पडले आणि त्याच वर्षी तारीख २ मार्च रोजी निधन पावले. सहाजिकच मराठा राज्यात पुन्हा आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. कारण गादीचा खरा वारस शाहू अजून औरंगजेबाच्या कैदेत होता. मृत राजाराम महाराजांच्या मुलांमध्ये कोणाही कर्त्या वयाचा मुलगा नव्हता. तेव्हा त्या परिस्थितीत औरंगजेबासारख्या शत्रूच्या आक्रमणाच्या संकटाचा विचार करून राज्य टिकविणे महत्त्वाचे होते. म्हणूनच छत्रपतीच्या गादीवर औरंगजेबाच्या कैदेत असलेल्या संभाजीचा मुलगा शाहू याचा अधिकार असताना रामचंद्रपंतानी मराठयांच्यातील दुही टाळण्यासाठी आपले व्यक्तीगत मत, परंपरा व धर्म रूढी बाजूला ठेवून राजारामाची पट्टराणी ताराबाई हिच्या आग्रहाला मान देऊन तिचा मुलगा शिवाजी, याला छत्रपतीचे अधिकार देऊन गादीवर बसविण्यास मान्यता दिली. मराठा "राजमंडळा"चा प्रमुख या नात्याने रामचंद्रपंताचे हे कार्य सुध्दा महत्त्वाचे आहे. कारण त्यामुळे, त्यावेळी मराठयांच्यातील दुही टाळता आली.

## अखेरच्या पर्वातील कार्य:

राजाराम महाराजाचे निधन होताच रामचंद्रपंताच्यावर दबाव आणून ताराबाईने तिचा मुलगा शिवाजी याला छत्रपती केले होते. पण तो वयाने त्यावेळी केवळ चार एक वर्षाचा होता. त्यामुळे त्याची आई म्हणून राज्यकारभाराची सर्व सुत्रे तिने आपल्या हाती घेतली. ती धाडशी आणि जबरदस्त महत्त्वकांक्षी होती. राजाराम महाराज जिंजीला गेल्यावर त्याच्या पश्चात महाराष्ट्रात मागे राहून तिने मोगलांच्या विरुध्द चालू असलेला मराठयांचा अभूतपूर्व संघर्ष पाहिला होता. त्या संघर्षाच्यावेळी रामचंद्रपंत "हुकुमतपन्हा" या नात्याने मराठा सरदारांना कसे मार्गदर्शन करतात व मराठयांचा राज्यकारभार, कसे चालवतात हे जवळून पाहिले होते. केव्हा प्रसंगी रामचंद्रपंताना त्यांच्या कार्यात

मदत केली होती. सेतुमाधवराव पगडी यांनी सांगितल्याप्रमाणे तिने त्या काळात मराठा योध्दयांना मार्गदर्शनही केले होते.[९] राजारामाच्या जिंजीहून आगमनानंतर तिने महाराष्ट्रात आल्यावर मराठा राज्याचा आवाका अधिक चांगल्या रीतीने समजून घेतला असावा, असे ब्रीज किशोर यांच्या निष्कर्षावरून दिसते.[१०] तर असा तिचा अनुभव व राज्य चालविण्याची जबरदस्त महत्त्वकांक्षा यामुळे रामचंद्रपंतानी तिच्यापुढे नमते घेऊन मराठा राज्यातील दुही जशी टाळली, तशी तिला राज्यकारभार करण्याची संधीही दिली होती. स्वाभाविकच तिने हातात सत्ता घेतल्यावर पंतानी तिच्या तंत्राप्रमाणे काम केले. तो काळ सुध्दा अत्यंत आणिबाणीचाच होता. औरंगजेब स्वत: मराठयांना बुडविण्याचा आपल्या म्हातारपणातही निकराचा आणि जोराचा प्रयत्न करीत होता. त्यांने गोव्याचे पोर्तुगीज व जंजि-याच्या सिद्दी यांनाही वश करण्याचे प्रयत्न चालविले होते. परिस्थिती कठीण आहे याचे भान ठेवून रामचंद्रपंतानी पोर्तुगी-जांच्या बरोबर सलोखा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. तसेच तळ कोकणात प्रत्यक्ष मोहिम काढून व कोन्होजी आंग्रे यांच्या सहकार्याने जंजि-याचा सिद्दी व इतरांचे काहीच चालू दिले नाही.[११] मोडक आणि इतरांनी ताराबाईच्या हाता-खाली काम करताना रामचंद्रपंत यांनी पूर्वीसारखे तत्परतेने काम केले नाही, असे म्हटलेले आहे.[१२] पण तसे झाले असले, तरी मराठयांच्या शत्रू विरुध्द लढताना रामचंद्रपंतानी जेवढे शक्य होते, तेवढे केलेले दिसते. म्हणूनच मराठयांची एकी अभंग राहिली. मराठयांच्या स्वराज्याचे रक्षण झाले आणि मराठयांच्या विरुध्द लढता लढता प्रचंड साम्राज्याचा दिल्लीपती आलमगीर बादशहा औरंगजेब मरुण गेला. एकापरिने हारला. रामचंद्रपंत किंवा त्यांच्या सारखा मराठा

---

९. पसेतुहिस्वमो., पृ. २९३. १०. Brij Kishore, *op.cit.*, p.64.
११. प्रस्तुत प्रबंधातील पृ. १२५.
१२. मोडक, बा.प्र., उपरोक्त., पृ. ११.

राज्यातील कर्तापुरुष आपल्या कर्तव्यापासून विचलित झाला असता, तर कदाचित् मराठयांना, हे यश लाभले नसते.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्यापुढे वारसदारांच्या निवडी संबंधाने संघर्ष होणे अटळ होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर अहमदनगर येथे येऊन त्याचा मुलगा आज्जमशाहा याने स्वत:ला बादशाहा म्हणून घोषीत केले आणि झुल्फिकारखानाच्या सल्ल्याने व मार्गदर्शनानुसार तो दिल्लीची गादी बळकवण्या-साठी उत्तरेकडे गेला. त्याला व त्याच्या समर्थकांना त्याच्यासाठी दिल्लीची गादी हवी होती. पण त्याच वेळी दक्षिणेतील मराठयांची सत्ता वाढू द्यावयाची नव्हती. ती नष्ट करण्याचे त्याचे ध्येयच होते. त्यासाठीच स्वत: औरंगजेब इ.स. १६८१ ते १७०७ अशी, जवळ जवळ २५ वर्षे महाराष्ट्रात राहिला होता. परंन्तु त्याकाळात मराठ्यांच्यामध्ये त्याला फूट पाडता आली नाही. मराठ्यांच्यात त्याला जर फूट पाडता आली असती, तर त्याने मराठा राज्य केव्हाच पादाक्रांत केले असते. पण त्याच्या काळात मराठयांच्यात फूट पाडणे त्याला व झुल्फिकारखाना सारख्या सेनापतीलाही शक्य झाले नव्हते. आणि मराठयांच्यात फूट पाडल्या खेरीज त्यांना जिंकता येणार नाही. याची मोगलांना खात्री झाली होती. म्हणून त्यांच्यात फूट पाडणे हे मोगलांचे धोरण होते. तेव्हा त्या धोरणाचा पुन्हा एकदा अवलंब करण्यासाठी दिल्लीकडे जात असताना झुल्फिकारखानाने आज्जमशाहाला सल्ला दिला. त्यानुसार शाहूला मोगलाची सनद देऊन सोडणे, व मोगलांच्यावतीने महाराष्ट्रातील मोगलांचा प्रतिनिधी म्हणून राज्य करण्यास पाठवून देणे, असे ठरले. शाहू हा छत्रपती संभाजी महाराजांचा मुलगा असल्याने हिंदू परंपरेनुसार त्याचा महाराष्ट्रात छत्रपती म्हणून राज्य करण्याचा अधिकार होता. त्याच्या अधिकाराला रामचंद्रपंत अमात्य

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

यांच्यासह अनेकांचा प्रत्यक्ष; अप्रत्यक्ष वा नैतिक पाठिंबा होता. मोगलांनी याची माहिती होतीच. त्यामुळे शाहूला कैदेतून मुक्त केल्यावर मराठयांच्यात दुही माजेल, असा झुल्फिकारखानाचा विश्वास होता. म्हणून शाहूला कैदेतून मुक्त केले. आणि शाहूनेही महाराष्ट्रात येत असताना आपण मोगलांच्या कैदेतून सुटून आल्याचे व आपणास सर्वांनी येऊन मिळावे, अशा प्रकारे पत्रांच्याद्वारे व जासूदांच्याद्वारे मराठा सरदारांना कळविले. शाहूच्या आगमनाची बातमी कळताच त्याला मराठा सरदारांनी प्रतिसाद दिला. रामचंद्रपंताच्या समोर सुध्दा त्यावेळी कोणता निर्णय घ्यावा, असा कठीणच प्रश्न होता. परंपरेनुसार त्यांच्याही दृष्टीने शाहू हाच, छत्रपती पदाचा खरा वारसदार होता. पण त्याच्या गैरहजरीत राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी प्रचंड लढा देऊन मोगलांच्या आक्रमणापासून मराठा राज्याचे रक्षण केले होते. राजारामाने केली हे राज्य टिकले नसते तर शाहूचा अधिकार व परंपरा यांचा प्रश्नच उद्भवत नव्हता. ही बाब पंतानी सिराची अशी नव्हतीच. तशातच ताराबाईने आग्रही टिकले होते, म्हणून त्या राज्याचा छत्रपती होण्याचा अधिकार तिच्याच मुलाला आहे, असा दावा केला होता.[13] तो दावा रामचंद्रपंत नाकारु शकत नव्हते. तेव्हा अशा परिस्थितीत रामचंद्रपंतानी ताराबाईशी एकनिष्ठ राहून कार्य केले. तिचा मुलगा शिवाजी याला छत्रपती म्हणून मान्यता दिली. आणि ताराबाईला कोल्हापूरचे राज्य निर्माण करायला सहकार्य केले होते.

अर्थात ताराबाईचा आग्रही स्वभाव व स्वत:च सर्वाधिकार वापरण्याची वृत्ती, यामुळे ताराबाई व रामचंद्रपंत यांच्यात कायमचे चांगले संबंध राहणे अशक्य होते. पण असे असले तरी जुनी जाणकार सरदार मंडळी रामचंद्रपंताकडूनच मार्गदर्शनाची अपेक्षा करीत. हे चालू असतानाच ताराबाईची सवत म्हणजे

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

१३. प्रस्तुत प्रबंध मागील पृ. ११३.

राजाराम महाराजांची ह्यात असलेली दुसरी बायको राजसबाई व तिचा मुलगा संभाजी, यांच्या मनामध्ये सुध्दा राजसत्तेची लालसा निर्माण झाली होती. तशातच ताराबाईचा मुलगा शिवाजी, हा आजारी व वेडा असल्याचेही बोलले जात होते.[१४] तेव्हा त्या परिस्थितीत रामचंद्रपंतानी वेगळी भूमिका घेऊ नये व मोगलांच्या कैदेतून सुटलेल्या शाहूला मिळू नये म्हणून त्यांना वसंतगड येथे ताराबाईने कैदेत टाकले होते. ताराबाईची ती चूकच होती. कारण तिचा पुत्र शिवाजी, याला छत्रपती म्हणून एकदा मान्यता दिल्यावर त्या वचनात बदल करावा, अशी रामचंद्रपंताची वृत्ती नव्हती. म्हणूनच ताराबाईच्या विषयी त्यावेळेपासून पंताच्या मनात अढी राहिली असल्याची शक्यता आहे. आणि त्या अढीच्या पोटी तथा ताराबाईचा अरेरावीचा कारभार थांबविण्यासाठी, तसेच तिचा वेडा मुलगा शिवाजी याच्या नावावर राज्य चालू देण्याऐवजी त्यांनी कोल्हापूरात राज्यक्रांती घडवून आणण्यासाठी सहकार्य केले असावे. त्यामुळेच ताराबाईला तुरुंगात टाकण्याचे धाडस तिचा सावत्र पुत्र संभाजी व त्याची आई राजसबाई यांना झाले असावे, असा निष्कर्ष स.मा.गर्गे यांनी काढलेला आहे.[१५] आणि तो योग्यच आहे.

कोल्हापूरातील अशा रक्तहीन राज्यक्रांतीनंतर ताराबाईचा सावत्र पुत्र संभाजी वयाच्या १६व्या वर्षी इ.स. १७१४ मध्ये कोल्हापूरचा छत्रपती झाला. साहजिकच रामचंद्रपंत पुन्हा "हुकूमतपन्हा" व "अमात्य" या पदावर विराजमान झाले. त्यावेळी त्यांच्यासारख्या संपन्न अनुभवाचा मराठा राज्याची दिर्घकाळ सेवा करणारा कोणही दुसरा पुरुष नव्हता. परिणामी कोल्हापूर मराठा राज्य चालविण्याची सर्व जबाबदारी त्यानीच आपल्या मृत्यूपर्यंत म्हणजे

---

१४. बेंद्रे राजाराम., पृ. ४११ व ५०८.

१५. गर्गे,स.मा., उपरोक्त., पृ. १०४-१०५.

इ.स. १७१६ पर्यंत यशस्वीपणे पार पाडली. त्याच कालात म्हणजे इ.स. १७१५ मध्ये कोल्हापूर संभाजीला मार्गदर्शन करण्यासाठी त्यानी मराठा राज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची व मराठयांची राजनीती विशद करणारे प्रसिध्द असे "आज्ञापत्र" लिहिले. कदाचित हे "आज्ञापत्र" लिहून ठेवण्यामागे त्यांचा असाही हेतू असेल की आपण गेलो. तरी, आपल्या पश्चात संभाजी राजानी शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवून व मराठयांची राजनीती नीटपणे समजून घेऊन, समर्थपणे राज्य करावे व लोकांच कल्याण साधावे.

असे हे रामचंद्रपंत अमात्य मराठा इतिहासातील एक कर्तृत्ववान, बुध्दिवान, राजनीतीज्ञ आणि विविध गुण संपन्न, असे थोर, कर्तबगार राजनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ, प्रसिध्द व अलौकीक पुरुष होते. त्यांनी केलेला त्याग व कार्य मराठा राज्याच्या निर्मितीसाठी तथा तद्नंतर बळकटीसाठी चिरंतन स्पाने कामी आलेले आहे. म्हणूनच मराठयांच्या इतिहासात त्यांना मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=